**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३७/२०२२.**
**महाराष्ट्र शासन/सोनु**
**नि.क्र.११ खाली**

**अभियोगपक्षातर्फे साक्षिदार क्र.१ याची साक्ष**

**मी शपथेवर सांगतो कि,**

**नावा – तुषार ओमप्रकाश वाघाळे**
**वय – ३५ वर्ष**
**धंदा – व्यापार**
**राहणार– नरखेड, ता.नरखेड, जि.नागपूर**

**सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता कुमारी एस. एस. गंगावणे मार्फत शपथेवर सुरु.**

१. मला दिनांक १६.१२.२०२१ रोजी दुपारी ०२.३० ते ०३.०० वाजताच्या दरम्यान संजय वाडीभस्मे यांनी फोनकरुन कळविले होते म्हणुन मी घटनास्थळी नरखेड येथे रुषी तलावाजवळील रोडवर गेलो होतो. मला तिथे दिसुन आले कि संजय वाडीभस्मे हे जखमी अवस्थेत त्यांच्या बाजुने रोडवर पडुन होते तसेच त्यांची दुचाकी सुध्दा पडुन होती. संजय वाडीभस्मे यांचा पाय तुटला होता व त्यांच्या हाताची बोटे देखील मला तुटलेली दिसली. त्यावेळी आरोपीने दारुच्या नशेत त्याच्या दुचाकीवर आणखी दोघेजण बसवुन फिर्यादीच्या डाव्या बाजुने जाउन त्यांच्या दुचाकीला धडक दिली व ते गाडी समोर घेउन जाउन आय.टी.आय. कॉलेजसमोर गाडीसह पडुन होते. त्यावेळी न्यायालयात हजर असलेला आरोपी गाडी चालवित होता व त्याच्यामागे दोघेजण बसुन होते. त्यानंतर आम्ही सर्व जखमींना एम्बुलन्समध्ये टाकुन सरकारी दवाखाणा, नरखेड येथे घेउन गेलो व तिथुन त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर मेडीकलला नेण्यात आले.

२. पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा तयार करण्यासाठी लेखी नोटीस दिला होता. आता साक्षीदाराला सदर नोटीस दाखविण्यात आला. त्यावर वर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर नोटीसला **नि.क्र.१२** देण्यात येते.

त्यानंतर पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळी घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. आता साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर घटनास्थळ पंचनाम्याला **नि.क्र.१२** देण्यात येते.

**<u>सरतपास संपला</u>**

**<u>उलटतपास आरोपीचे अधिवक्ता श्री.एस.टी.क्षिरसागर मार्फत</u>.**

३. आरोपींच्या वकीलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. आरोपीने स्वता उलट तपास घेण्यास नकार दिला. करिता उलट तपास काही नाही.

| | |
|---|---|
| **श्रवणोत्तर स्विकृत** | **समक्ष** |
| (पी.आर.पाटील) | (पी.आर.पाटील) |
| **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,** | **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,** |
| **नरखेड** | **नरखेड** |

**दिनांक – ०९.०८.२०२४.**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतिप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव– अ.य.कुळकर्णी(श्रेणी–३)**